**प्रेसनोट** **दिनांक १५/०६/२०१९**

## बंडगार्डन पोलीस स्टेशन

## महिलेची हरविलेली पर्स,तिचे ताब्यात दिले बाबत

दिनांक १४/०६/२०१९ रोजी सायंकाळी ०७.०० वा.चे सुमारास बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील माहिला पोलीस कर्मचारी अश्विनी बनसोडे व स्वाती थोरात या पीएमपीएल बसमध्ये पेट्रोलींग करीत असताना, त्यांना बस मध्ये कोपऱ्यात एक पर्स मिळाली. महिला पोलीसांनी पर्स ताब्यात घेतली पर्स उघडून पाहिली असता त्यामध्ये महत्वाची कागदपत्रे असल्याचे आढळून आहे. त्यावरून मोबाईल नंबर शोधून, फोन केला असता, संध्या भापकर यांनी फोन उचलला. त्यांना पर्स बाबत विचारले असता, त्यांनी प्रवासात पर्स कोठेतरी गहाळ झाली होती असे सांगितले त्यांना बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे बोलावून घेवून पर्सची ओळख पटवून, पर्स त्यांचे ताब्यात दिली. महत्वाची कागदपत्रे परत मिळाल्याचे त्यांचे चेहऱ्यावर समाधान दिसुन आले.

सदरची चांगली कामगिरी बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील, माहिला पोलीस कर्मचारी अश्विनी बनसोडे व स्वाती थोरात यांनी केली आहे.

